वर्ष-०८ | अंक-३३ | मुंबई, मंगळवार ०५ ते ११ जुलै - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page



PG 2 पोलिसांच्या हातावर तुरी देऊन आरोपी पसार; अवधूतवाडी पोलिसात गुन्हा दाखल

3 → कल्याण पूर्वेत तिसगाव नाक्यावरील खड्ड्यांनी प्रवासी हैराण, 15 दिवसापूर्वी बुजविले होते खड्डे

पत्नीला माहेरी जाण्यास नकार देणाऱ्या वडिलांवर मुलाकडून चाकू हल्ला ← 4


# मोबाइवरून आर्थिक व्यवहार करताना जागरूक राहावे

## नवनिर्वाचित पोलीस आयुक्तांचे आवाहन



मुंबई : मुंबईमध्ये दिवसेंदिवस सायबर गुन्हे वाढत असून नागरिकांनी मोबाइलवरून आर्थिक व्यवहार करताना जागरूक राहावे, असे आवाहन मुंबईचे नवनिर्वाचित पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी केले आहे. दरम्यान, मुंबई पोलीस दलामार्फत सायबर सुरक्षेविषयी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचबरोबर समाज माध्यमावर जनजागृती करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमुद केले.मुंबई २०२१ मध्ये दोन हजार ८८३ सायबर गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी केवळ ४५५ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. दाखल झालेल्या केवळ १६ टक्के गुन्ह्यांचा तपास पोलिसांना करता आला आहे. सायबर गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाण २०20 मध्ये केवळ ९ टक्के होते. त्या तुलनेत २०२१ मध्ये सुधारणा झाली असली तरी ते प्रमाण फार कमीच आहे. सायबर गुन्हे वाढत असल्याने त्यावर उपाययोजना करण्यात येत आहे. त्यामुळे कोणत्या गोष्टी टाळल्या तर, सायबर गुन्ह्याच्या चक्रात अडकणार नाही, याची माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. नागरिकांनीही सतर्क राहणे आवश्यक आहे, असे मत फणसळकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर व्यक्त केले होते. ट्विटरवरील मुंबई पोलिसांच्या खात्यावरून सायबर सुरक्षेबाबत माहिती देण्यात येत आहे. ऑनलाईन पेमेंट करताना कोणती सावधगिरी बाळगावी, कोणत्या गोष्टी करू नये, याची माहिती देण्यात येत आहे.

सायबर गुन्हे रोखण्यासाठी जागरुकतेची गरज आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी अन्य उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र नागरिकांनी जागरुक असणे गरजेचे आहे, असे संदेश समाज माध्यमावर प्रसारित करण्यात येत आहेत. मोबाइल पिन आणि यूपीआय पिन वेगळा असावा

यूपीआयशी संबंधित कोणतीही माहिती कुणालाही देता कामा नये. पिनची गरज केवळ रक्कम हस्तांतरित करण्यासाठी असते, रक्कम खात्यात जमा करण्यासाठी नाही. कोणतेही संशयास्पद व्यवहार झाल्यास, खात्यावरील यूपीआय सेवा त्वरित दिसणार नाही असा पर्याय कार्यान्वित करावा. संशयास्पद संदेश आणि फोनबाबत तक्रार करावी, असे आवाहन मुंबई पोलिसांनी समाज माध्यमावर केले आहे.

# मुख्यमंत्री होताच एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा, सर्वसामान्यांना मोठा दिलासा



मुंबई : एकनाथ शिंदे गट आणि भाजप यांच्या युतीचं सरकार आलं आहे. सत्तेत आल्यानंतर पहिल्यांदा एकनाथ शिंदे यांनी सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारी घोषणा केली आहे. गेल्या काही दिवसात पेट्रोल-डिझेल आणि वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकाचं कंबरडं मोडलं होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही समस्या लक्षात घेतली. युतीचं सरकार सत्तेत येताच मोठी घोषणा केली आहे. पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट कमी करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यातील पेट्रोल-डिझेलच्या किंमती उतरण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय म्हणाले? 'आपल्या सरकारच्या वतीने पेट्रोल डिझेलवरचा व्हॅट कमी करू आणि बळीराजाच्या मदतीसाठी सर्व प्रयत्न करू. मी तुम्हाला आश्वस्त करतो की, चुकीची कामं करणार नाही. कोणावरही आकस बुद्धी ठेवणार नाही. आम्ही कार्यकर्ते आहोत कार्यकर्तेच राहणार. या राज्यांचं सर्वांगिन काम करणारं सरकार आपण चालवू. केंद्र सरकारचीही मदत घेऊ. आणि राज्याला सुजलाम सुफलाम करू. आम्हाला कधीही ग ची बाधा होऊ देणार नाही.' तर शेतकरी आत्महत्या करणार नाहीत यासाठी युती सरकार प्रयत्न करेल असा विश्वास त्यांनी विधिमंडळात दर्शवला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या दोन मोठ्या घोषणा केल्या आहेत. आता याबाबत निर्णय कधी होणार याकडे संपूर्ण जनतेचं लक्ष लागलं आहे.

# दुबईतून आलेल्या व्यक्तीचे मुंबईतून अपहरण

## पॉन्डिचेरीतून सुटका करण्यात मुंबई पोलिसांना यश



मुंबईः दुबईहून परतलेल्या व्यक्तीचे मुंबईतून अपहरण करून १५ लाख रुपयांची खंडणी मागित्याचा प्रकार घडकीस आला असून याप्रकरणी शीव पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या पथकाने पॉन्डिचेरी येथे जाऊन अपहरण झालेल्या व्यक्तीची सुटका केली. याप्रकरणी आरोपींची शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दुबईत कामानिमित्त गेलेल्या ४७ वर्षीय व्यक्तीची मुंबईतील शीव परिसरातून अपहरण झाले. शंकर मथमल्ला असे या व्यक्तीचे नाव असून ते तेलंगणा येथील रहिवासी आहेत. त्यांचा मुलगा हरीश मथमल्ला यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. मथमल्ला २२ जूनला दुबईहून मुंबईत आले होते. त्यानंतर शीव येथून त्यांनी गावी जाण्यासाठी बसचे तिकीट घेतले. पण ते घरीच पोहोचले नाही. त्यानंतर त्यांचा मुलगा व मेहूणा त्यांचा शोध घेण्यासाठी मुंबईत आले. त्यावेळी त्यांच्या वडिलांनी बसचे तिकीट रद्द केल्याचे त्यांना समजले. त्यानंतर हरीशने शीव पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी शंकर बेपत्ता असल्याची नोंद केली. त्यानंतर शंकर यांनी स्वतः ...पान २ वर...

# मुव्हर्स अँड पॅकर्स च्या नावाखाली चोरी करणारे अटकेत -2 गुन्हयांची उकल करण्यास विरार पोलिसांना यश



विरार : विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने मुव्हर्स अँड पॅकर्स च्या बहाण्याने घरात प्रवेश करुन चोरी करणाऱ्या टोळीस अटक केली असून याप्रकारचे ०२ गुन्हे देखिल उघडकीस आणले आहेत. अधिक माहितीनुसार विरार पोलीस ठाणे हद्दित मुव्हर्स अँड पॅकर्स म्हणुन घरातील सामान पॅक करुन शिप्ट करण्यासाठी आलेल्या कामगारांनी सामान पॅक करतेवेळी बॅगमधील किंमती सोने व चांदीचे मौल्यावान दागिने चोरी केले याबाबत फिर्यादी यांनी दिनांक ३१/०५/२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयांचा तपास सुरु केला.

गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट देवुन तांत्रीक माहितीचे आधारे व गुप्त बातमीदारांमार्फत माहिती काढुन आरोपी १) शुभमकुमार धन्नुलाल वर्मा, रा.ठी. कांदिवली, आकोली रोड, क्रांती नगर, गणेश चाळ,मुंबई-१०१, मुळ रा. उत्तरप्रदेश २) दिपक राजेशकुमार विश्वकर्मा, रा.ठी. शितला माता चाळ, विनय टॉवर, कांदिवली पुर्व, , मुळ रा. राज्य-उत्तरप्रदेश यांना कुरार, मुंबई येथुन ताब्यात घेऊन तपासअंती अटक केली आहे. आरोपींकडे पोलिसांनी गुन्हांच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली असुन त्यांच्याकडुन नमुद गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण रु. ११,००,७०८/- किंमतीचे सोने - चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत.तसेच सदर आरोपी यांचा मुंबई येथील ओशिवरा पोलीस ठाणे, येथील गुन्हयांत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल कि.अं.रु. ३0,000/- चा सॅमसंग कंपनीचा मोबाईल देखील हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३,विरार , श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे, श्री. दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप शेरमाळे, पो.ना. हर्षद चव्हाण, पो.शि.संदीप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सागर घुगरकर यांनी केली आहे.

# पोलिसांचा खबरी असल्याच्या कारणावरून; कल्याणमधील तरुणाला बेदम मारहाण



कल्याण- 'तुम्ही पोलिसांचे खबरी आहेत. तुम्ही पोलिसांना माहिती देता. त्यामुळे आमच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत,' असे सांगत कल्याण जवळील एक नोकरदार तरुण आणि त्याच्या साथीदाराला कल्याणधील चार जणांनी बेदम मारहाण केली. या तरुणांवर चाकूने हल्ला केल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी सांगितले, कल्याण जवळील वडवली गावातील रवी बाळाराम पाटील (३०) हे नोकरदार आहेत. रवी यांचा मित्र जितेश पाटील यांना कल्याण मधील चार जणांनी उल्हास नदीवरील पुलाजवळ अडविले आणि त्याला शिवीगाळ सुरू केली. ही माहिती जितेशने मित्र रवी यांना दिली. रवी तात्काळ उल्हास खाडी जवळील पुलावर दुचाकीने आला.

तेथे चार जण जितेश याच्याशी भांडण करुन त्याला शिवीगाळ करत होते. रवी पाटील यांनी मध्यस्थी करून हा विषय मिटविण्याचा प्रयत्न केला. तो मध्यस्थी करत असताना प्रथमेश सुधीर पाटील, हमेंत पाटील, करण सुधीर पाटील व अन्य एक इसम यांनी 'तुम्ही दोघे पोलिसांचे खबरी आहेत. तुम्ही पोलिसांना माहिती देता. त्यामुळे आमच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत,' असे बोलून दोघांना मारहाण केली. प्रथमेशने रवी यांना जोरदार धक्का देऊन खाली पाडले. हातामधील चाकुने रवीवर वार केले. इतर मित्रांनी लोखंडी सळईने रवीला बेदम मारहाण केली. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेले. खडकपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी रवी पाटील यांनी तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# पुणे : व्यापाऱ्याच्या घरातील 60 तोळे दागिने चोरणाऱ्या तिघांना अटक



पुण्यातील मार्केटयार्ड येथील व्यापाऱ्याच्या घरातील तब्बल ६० तोळ सोने-चांदीचे दागिने आणि काही रक्कम अशी एकूण ३० लाखांची चोरी करणाऱ्या तीन अट्टल चोरट्यांना बिबवेवाडी पोलिसांना अटक करण्यात यश आले आहे. ...पान २ वर...

# धुराने गुदमरून महिलेचा मृत्यू, तर गुदमरलेल्या चौघेजण पडले बेशुद्ध



उल्हासनगर : विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचपाडा गावातील एका खाजगी बंगल्यात शॉर्टसर्किटमुळे शनिवारी मध्यरात्री आग लागली. बेडरूममध्ये असलेल्या एका महिलेचा श्वास गुदमरून मृत्यू झाला तर चौघेजण गुदमरून बेशुद्ध झाल्याची घटना ...पान २ वर...

# नवनीत राणा यांचे आरोप खोटे, एनआयएला तपास सोपवला : पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह



नुपूर शर्मा यांचे समर्थन केलं म्हणून अमरावतीच्या मेडिकल व्यावासायिक असलेल्या उमेश कोल्हे यांची हत्या करण्यात आली होती. अमरावती पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी इरफान शेख याला न्यायालयात हजर केले होते. इरफान शेख याला न्यायालयाने 7 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याच दरम्यान हे प्रकरण अमरावती पोलिसांनी एनआयएला सोपवले आहे. याप्रकरणी बोलताना अमरावतीच्या पोलीस आयुक्त डॉ. आरती सिंह म्हणाल्या की, अमरावती येथील उमेश कोल्हे हत्या प्रकरणी आम्ही सुरुवातीपासून बारकाईने तपास करत होतो. अमरावती शहराची परिस्थिती पाहून आणि सगळे पुरावे हाती आल्यावर आम्ही माहिती दिली, असं त्या म्हणाल्या. एबीपी माझाशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. आठ आरोपी अद्यापही फरार

पोलीस आयुक्त डॉ.आरती सिंह म्हणाल्या की, एनआयएला हा तपास आम्ही सोपवला आहे. या प्रकरणातील सातही आरोपीना एनआयएच्या ताब्यात देण्यात येणार आहे. त्या म्हणल्या की, या प्रकरणातील आठ आरोपी अद्यापही फरार आहे. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तसेच हे प्रकरण अतिसंवेदनशील असल्याचेही त्या म्हणाल्या आहेत. खासदार नवनीत राणा यांनी पोलीस आयुक्त डॉ.आरती सिंह यांच्यावर लावलेल्या आरोपावर त्या म्हणाल्या आहे की, हे आरोप खोटे आहेत. आम्ही सर्व पुरावे मिळाल्या शिवाय माहिती दिली नाही. पोस्ट हटवण्यासाठी धमकी देण्यात आल्याचे आतापर्यंत आमच्याकडे फक्त एकच व्यक्तीची फिर्याद आली आहे की, आम्हाला नुपूर शर्मा पोस्ट केल्यामुळे धमकी दिली आहे. आम्ही त्यांना विश्वासात घेऊन चर्चा केली असून त्याबाबत आवश्यक ती कारवाई केली ...पान २ वर...

# गिरनार फार्मवर सुरु असलेल्या 'ट्रॉपिकल अफेअर' पार्टीवर पोलिसांची धाड

## मात्र शहरातील क्लबमधील पार्ट्या सुसाट



नागपूरः राज्यात मुंबई-पुण्याच्या पावलावर पाऊल ठेवून नागपुरातही 'विकेंड पार्ट्यां'ना सुरुवात झाली आहे. सर्वच नियमांना तिलांजली देत शेकडोंच्या संख्येत मद्यधूंद तरुणाईच्या पार्टीवर उपायुक्त गजानन राजमाने यांच्या नेतृत्वात विशेष पथकाने धाड टाकली. रात्री उशिरापर्यंत सुरु असलेल्या या पार्टीमध्ये हजाराच्या जवळपास तरुण जमले होते. या फॉर्महाऊसवर सुरु असलेल्या कारवाईबाबत स्थानिक पोलिस ठाण्याला कुठलीही कल्पना न देत ही कारवाई करण्यात आली. पोलिस आयुक्तांनी तडकाफडकी हिंगणा पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकाची बदली केली. मात्र दुसरीकडे शहरातील क्लबमध्येही रात्रभर पार्ट्यासुरु असताना त्यांच्यावर पोलिसांची मेहरनजर का असा सवाल याठिकाणी ...पान २ वर...

पृष्ठ १ वरुन

## दुबईतून आलेल्या व्यक्तीचे मुंबईतून अपहरण

मुलाला दूरध्वनी करून आपण चेन्नईमध्ये रुग्णालयात भरती असल्याचे सांगितले. त्यानंतर दूरध्वनी बंद झाला. मुलाने वारंवार दूरध्वनी केला, पण दूरध्वनी लागला नाही. त्यानंतर त्यांना दुसऱ्या क्रमांकावरून दूरध्वनी आला. त्यात तुमचा व्यक्तीला अल्सरवर उपचार घेत असल्याचे सांगून त्याने फोन बंद केला. त्यानंतर २८ जूनला तक्रारदाराच्या मुलाला विविध १० क्रमांकावरून दूरध्वनी आले, त्या व्यक्तीने १५ लाख रुपयांची मागणी केली. रक्कम दिल्यावर वडिलांना सोडण्यात येईल, असे सांगितले. त्यामुळे मुलाने घडलेला प्रकार शीव पोलिसांना सांगितला. त्यानुसार पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखाही याप्रकरणाचा समांतर तपास करीत होते. त्यासाठी एक पथक महाराष्ट्राबाहेर तपासासाठी गेले. त्यांनी पॉन्डिचेरी येथून शंकर यांची सुटका केली. दोन आरोपींनी शंकरचे अपहरण करून त्यांना मारहाण केली. त्यानंतर त्यांचे छायाचित्र मुलाला पाठवले व खंडणीची मागणी केली. शंकरला सध्या उपचारासाठी शीव रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## नवनीत राणा यांचे आरोप खोटे

जाईल. यावेळी त्यांनी शहरातील नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन देखील केले. आरती सिंह पुढे म्हणाल्या की, या प्रकरणातील मुख्य आरोपी इरफान शेखने इतर आरोपी यांना 10 हजार आणि एक बाईक दिली. हत्या प्रकरणातील आरोपी युसूफ याच्यावर उमेश कोल्हे यांची उधारी होती. त्या म्हणाल्या की, व्हॉट्सअॅप व इतर सोशल मीडिया माध्यमावर आम्ही लक्ष ठेऊन आहे. धमकीचे फोन आल्यास तक्रार करावी. तपास करण्यात येईल, असं त्या म्हणाल्या.

## धुराने गुदमरून महिलेचा मृत्यू, तर

घडली. दरम्यान चौघांची तब्येत ठणठणीत असून त्यांना रुग्णालयातून सुट्टी मिळाल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी दिली.

उल्हासनगर विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचपाडा पूर्वेतील 'आई' या बंगल्याला शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागली. यावेळी बेडरूम मध्ये असलेल्या जयश्री भरत म्हात्रे या महिलेचा श्वास गुदमरून मृत्यू झाला. तर आगीमुळे त्यांचा मुलगा व इतर तीन जणांनी आग विजविण्याचा प्रयत्न केला. त्यात ते होरपळून व श्वास गुदमरल्याने बेशुद्ध झाले. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेते असून त्यांची तब्येत ठणठणीत झाली. त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी दिली.आगीच्या दुर्घटनेत मृत पावलेल्या जयश्री यांचे पती भरत म्हात्रे हे उत्तर भारतात देव दर्शनाला गेल्याचे सांगण्यात येत आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवीत काही तासात आग आटोक्यात आणली. याबाबत विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन मध्ये आकस्मिक गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आग कशामुळे लागली याचा शोध पोलीस व अग्निशमन दलाचे अधिकारी घेत आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड करीत आहेत.

## पुणे : व्यापाऱ्याच्या घरातील 60 तोळे

मुस्तफा शकील अन्सारी (रा. ग्रीन पार्क कोंढवा), जुनेद रिजवान सैफ आणि हैदर कल्लू शेख असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावं आहेत. परिमंडळ ५ च्या पोलीस उपायुक्त नम्रता पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, बिबवेवाडी येथील सोबा सवेरा या सोसायटीमधील १० व्या मजल्यावर मार्केटयार्ड येथील एक व्यापारी राहतात. ते २० जून रोजी दुपारच्या सुमारास कुटुंबीयांसह बाहेर गेले होते. त्यावेळी आरोपी मुस्तफा शकील अन्सारी याने टेरेसवरील ग्रील तोडून घरामध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्याने काही तासात सोने,चांदीचे दागिने आणि काही रक्कम अशी मिळून जवळपास ३० लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. त्या घरात राहणारी मंडळी आल्यावर घरातील वस्तू इतरत्र पडल्याचे दिसून आले. त्यानंतर घरफोडीची घटनासमोर आली. त्यावर त्यांनी आमच्याकडे तक्रार देताच, आम्ही घटनास्थळी धाव घेतली आणि त्या परिसरातील सीसीटीव्ही तपासले. त्यावेळी आरोपी मुस्तफा शकील अन्सारी आणि अन्य दोन आरोपी संशयितरित्या आढळून आले. त्या आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केल्यावर, या तिघा आरोपींना २ जुलै रोजी अटक करण्यात आली. त्या तिघांकडे चौकशी केल्यावर, यातील मुख्य आरोपी मुस्तफा शकील अन्सारी याने घरातील बाथरूमवरील पाण्याच्या टाकीत, आरोपी जुनेद रिजवान सैफ याने फ्रीजच्या कंप्रेसरमधील पाण्यात सोने चांदीचे दागिने ठेवले. तर तिसरा हैदर कल्लू शेख याने काही दागिने विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. या तिघांकडून सोने-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले असून या आरोपीकडे चौकशी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# सुलेमानी खड्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांना गंडा



सोलापूर - सुलेमानी खड्याचे आमिष दाखवून पोलिसांच्या खबऱ्यानेच पुण्यातील एका व्यक्तीची पाच लाख रुपयांची फसवणूक केली आहे. सदर बाजार पोलीस ठाण्यात याबाबत 1 जुलै रोजी गुन्हा दाखल होताच तीन संशयित आरोपींना ताब्यात घेत दोन तासांत गुन्हा उघडकीस आणला. यामध्ये पोलिसांनी इमरान इलाई पठाण (वय 37 वर्ष, रा शास्त्रीनगर, सोलापूर), जफर उर्फ सिराज मोहम्मद हाशम शेख (वय 57 वर्ष, रा. केशवनगर, दक्षिण सदर बाजार, सोलापूर), सलमान जैनोद्दीन नदाफ (वय 26 वर्ष, रा, सिद्धेश्वरनगर भाग 5, सोलापूर) या तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. याबाबत पोलिसांनी शनिवारी 2 जुलै रोजी अधिकृत माहिती दिली. सुलेमानी खड्यासाठी पुण्याहून सोलापुरात : सूर्यकांत बबन आढळगे (वय 42 रा., हडपसर, पुणे) हे दिव्य शक्ती असलेल्या सुलेमानी खड्यासाठी सोलापुरात आले होते. सूर्यकांत हे पुणे येथे जमीन विक्रीच्या व्यवसायात कमिशन एजंटचे काम करतात. सुलेमानी खड्याच्या विक्रीमधून मोठा लाभ मिळेल, या आशेपोटी त्यांनी सुलेमानी खड्यासाठी केरळ राज्यातील ग्राहकदेखील बघितला होता. 28 जून 2022 रोजी सूर्यकांत आढळगे हे सोलापुरातील नामांकित हॉटेल लोटसमध्ये मुक्कामी आले होते. जफर उर्फ सिराज शेख याने सुलेमानी खड्याचे आमिष दाखवले होते. ऑनलाइनरीत्या जफर शेख आणि सूर्यकांत यांचे संपर्क झाले होते. पण, जफर शेख याने सुलेमानी खड्याच्या निमित्ताने वेगळाच प्लॅन आखला होता. दोघांमध्ये झालेल्या व्यवहाराने या सुलेमानी खड्याची किंमत 5 लाख रुपये ठरविण्यात आली होती. आणि तो सुलेमानी खडा किंवा सुलेमानी पत्थर सूर्यकांत आढळगे केरळ राज्यातील ग्राहकाला 7 लाख रुपयांना विक्री करणार होते. सुलेमानी खडा दाखवण्याअगोदर पाच लाख रुपये मागितले : संशयित आरोपी जफर उर्फ सिराज याने सुलेमानी खडा माझ्याकडे आहे, असे सांगत लोटस हॉटेल येथे गेला. हा खडा दाखवण्याअगोदर पाच लाख रुपये दाखवा मगच खडा दाखवतो, असे सांगितले. त्यावेळी सूर्यकांत आढळगे यांनी पाच लाख रुपयांची बॅग दाखवली आणि त्यामधील रोख रक्कम दाखवली. केरळ राज्यातून आलेले ग्राहकदेखील सुलेमानी खडा पाहण्यासाठी आतुरतेने वाट पाहत होते. पोलिसांचा खबऱ्याच क्राईम ब्रँचचा अधिकारी बनून पोहोचला : दिव्य शक्ती असलेल्या सुलेमानी खड्याची तस्करी करणे हा कायदेशीर गुन्हा आहे. हा व्यवहार अतिशय गुप्त पद्धतीने सुरू होता. पण, ऐनवेळी पोलिसांचा खबरी म्हणून काम करणारा इमरान इलाई पठाण हा सलमान नदाफ याला सोबत घेऊन क्राईम ब्रँचचा तोतया अधिकारी बनून घटनास्थळी पोहोचला आणि सर्व जणांना अटक करायचे आहे, असे सांगू लागला. यामुळे केरळ राज्यातील चार इसम आणि सूर्यकांत आढळगे हे घाबरून गेले आणि पळापळ करू लागले. या झटापटीत जफर उर्फ सिराज शेख आणि इमरान इलाई पठाण याने पाच लाख रुपयांची बॅग हिसकावून घेतली. स्वतःचे भविष्य उज्ज्वल करण्याकरिता सुलेमानी खडा खरेदीसाठी आलेल्यांनी पाच लाख रुपये सोडून पळून गेले. हॉटेल मॅनेजरने धीर देत फिर्याद देण्यास सांगितले : सूर्यकांत आढळगे हे 28 जून 2022 रोजीच पोलिसांच्या भीतीने सोलापुरातून पळून गेले होते. पण, ही झटापट, गोंधळ हॉटेल मॅनेजरने पाहिले होते. लोटस हॉटेलच्या मॅनेजरने सूर्यकांत आढळगे यांच्याशी संपर्क करून त्यांना पुन्हा सोलापुरात बोलावून घेतले आणि सदर बाजार पोलीस ठाणे येथे फिर्याद देण्यास सांगितले. 1 जुलै रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद नोंद झाली. पोलिसांनी ताबडतोब तपासाची चक्रे फिरवली आणि सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. सीसीटीव्ही पाहिले असता त्यांचा खबरीच दिसल्याने पोलिसांना धक्का बसला.पोलिसांकडून आरोपींना अटक : सदर बाजार पोलिसांनी ताबडतोब खबऱ्या इमरान पठाण यास ताब्यात घेतले आणि बाकीच्या तिन्ही संशयित आरोपींना ताब्यात घेऊन पाच लाख रुपयांची रक्कम हस्तगत केली. गुन्हा दाखल होताच दोन तासांत तिन्ही संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे. तिघा संशयितांना कोर्टात हजर केले असता 4 जुलैपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. याचा अधिक तपास पीएसआय सचिन माळी करीत आहेत. सुलेमानी खडा असल्याचे खोटं आमिष : पोलिसांनी कसून तपास केला असता या संशयित आरोपींकडे कोणत्याही प्रकारचा दिव्य शक्ती असलेला सुलेमानी खडा नव्हता. फसवणूक करून लुबाडण्यात आलेली सर्व पाच लाख रुपयांची रक्कम हस्तगत करण्यात आली. याचा तपास करताना पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, पीएसआय सचिन माळी, औदुंबर आटोळे, इसाक नदाफ, शाहजहान मुलाणी, राजेश चव्हाण, सागर सरतापे, सैपन सय्यद, राम भिंगारे, विठ्ठल काळजे, मल्लू बिराजदार, अब्रार दिंडोरे आदींनी महत्त्वाची कामगिरी बजावली. डीसीपी डॉ. वैशाली कडुकर यांनी उलट आवाहन करीत सांगितले की, कष्टशिवाय मार्ग नाही. नागरिकांनी पैसे कमविण्यासाठी असे शॉर्टकट वापरू नये, असे आवाहन केले.

# आधिकच्या नफ्याचे आमिष देऊन, 47 जणांना घातला कोट्यवधीचा गंडा




सांगली : आधिकच्या नफ्याची आमिष देऊन 47 जणांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. ऑनलाइन ट्रेडींग गुंतवणुकीच्या नावाखाली तीन कोटी 37 लाखांची ( Fraud of Rs 3.37 crore) फसवणूक केल्याचा हा प्रकार असून या प्रकरणी मिरज ग्रामीण पोलीस ठाणे मध्ये समीर अख्तर हुसेन याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिरज येथील तासगाव फाटा या ठिकाणी राहणाऱ्या समीर अख्तर हुसेन याने त्याच्या ओळखीतल्या काही व्यक्तींना ऑनलाइन ट्रेडिंग मध्ये पैसे गुंतवल्यास जादा परतावा मिळतो असे सांगितले.सुमारे 12 ते 25 टक्के इतका नफा मिळण्याचे आमिष दाखवत सुमारे 47 जणांकडून 50 हजारांपासून दीड ते 2 लाख रुपयापर्यंत गुंतवणूक करायला लावली. यामध्ये सांगली,कोल्हापूर आणि कर्नाटक राज्यातील विजापूर आणि बेळगाव जिल्ह्यातील 47 जणांनी समीर हुसेन याच्याकडे पैसे गुंतवले.काही दिवसांनंतर समीर हुसेनने नफा आणि पैसे देण्याबाबत टाळाटाळ सुरू केली .अनेकांनी समीर हुसेन याच्या घरावर धडक दिली, मात्र त्या ठिकाणी,तो राहत नसल्याचे समोर आले. तसेच तो कोणाचेही फोन उचलत नव्हता, तेव्हा फसवणूक झाल्याची बाब समोर आली. यामुळे 47 जणांनी मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये धाव घेऊन समीर हुसेन याच्या विरोधात फसवणूक केल्याची तक्रार दाखल केली. या प्रकरणी मिरज ग्रामीण पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पोलिसांच्या हातावर तुरी देऊन आरोपी पसार; अवधूतवाडी पोलिसात गुन्हा दाखल

यवतमाळ - क्रिकेट सट्यातील आरोपीने पोलीसांच्या हातावर तुरी देऊन पलायन केल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. त्याला नांदेड जिल्ह्यातील किनवट येथून पिंपरी चिंचवड पोलिसांनी अटक केली होती. ही घटना 1 जुलै रोजी पहाटे तीन वाजे दरम्यान दारव्हा मार्गावरील हॉटेल ग्यॅनसनमध्ये घडली. या घटनेने पोलिस वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. रामदेव मोहनलाल शर्मा ( 42), रा. नवीननगर, किनवट, जि. नांदेड), असे फरार झालेल्या आरोपीचे नाव आहै. आयपीएल सामन्यावर सट्टा - 21 मे रोजी मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल या दोन संघातील आयपीएल सामन्यावर काही लोक सट्टा घेत असल्याची माहिती पिंपरी चिंचवड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सांगवी ठाणे हद्दीत छापा टाकून पाच जणांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून सट्ट्याचे साहित्यही जप्त करण्यात आले होते. बनावट कागदपत्रांचा वापर करून सिम कार्ड घेऊन त्याचा वापर करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याने पिंपरी चिंचवड पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंद होता. या गुन्ह्यात विनोद अग्रवाल याच्याकडे करण्यात आलेल्या तपासात रामदेव शर्मा याचा सहभाग आढळून आला.किनवटमधून आरोपीला अटक - वरिष्ठांच्या परवानगीने पोलिस पथकाने किनवट गाठून आरोपीला अटक केली. अवधूतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत याच गुन्ह्याच्या अनुषंगाने काही आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस दारव्हा मार्गावरील हॉटेलात थांबले. पोलिस फ्रेश होत असल्याची संधी साधून रामदेव शर्मा याने पोलिस कर्मचाऱ्यांच्या हाताला झटका देऊन पळ काढला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. मात्र, अंधाराचा फायदा घेत गल्लीबोळातून आरोपी पळून गेला. या प्रकरणी पिंपरी चिंचवडचे सहायक पोलिस निरीक्षक अंबरीश देशमुख यांनी अवधूतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास ठाणेदारांच्या मार्गदर्शनात करण्यात येत आहे.

## गिरनार फार्मवर सुरु असलेल्या 'ट्रॉपिकल अफेअर' पार्टीवर पोलिसांची धाड

उपस्थित होत आहे. नागपूरात विकेंड पार्ट्यांची क्रेझ तरुणाईमध्ये वाढली आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार तर शहरातील लाऊंज फुल्ल असतात. यासह शहराच्या नजिक असलेल्या पबमध्येही याच प्रकारची गर्दी विकेंडला होत असते. याचाच फायदा घेत हजारो रुपये प्रवेश शुल्क घेऊन 'ट्रॉपिकल अफेअर' मोठ्या कॉन्सर्टचे आयोजन वर्धा मार्गावरील गिरनार फार्म या खासगी फार्महाऊसवर करण्यात आले होते. याठिकाणी सायंकाळी पाच ते रात्री दहा दरम्यान कार्यक्रमाची परवानगी घेण्यात आली होती. याशिवाय डिजे वाजविण्याच्या परवानगीसाठी तर फक्त पोलिस ठाण्यात दिलेल्या अर्जाच्या पोचपावतीवरच कार्यक्रम सुरु असल्याचे पोलिस तपासात उघड झाले.

या पार्टीत मोठ्या प्रमाणात तरुण तरुणी सहभागी झाले होते. जेव्हा काल मध्यरात्री पोलीस या फार्महाऊसवर पोहोचले तेव्हा डीजेच्या तलवार शेकडो तरुण तरुणी दारूच्या नशेत झिंगत नाचत होते. दारू सह या पार्टीत ड्रग्स चा वापर ही सुरु होता का याचाही तपास आता पोलीस करीत आहेत. नागपूर वर्धा रोडवर हिंगणा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या जामठा क्रिकेट स्टेडियमच्या जवळ एका खाजगी फार्महाउस वर मध्यरात्रीनंतर ही एक पार्टी सुरु असल्याची माहिती नागपूर पोलिसांना मिळाली होती. या पार्टीसाठी संध्याकाळी 5 ते रात्री 10 वाजेपर्यंतची परवानगी घेण्यात आली होती. मात्र तरीही मध्यरात्रीपर्यंत ही पार्टी सुरु असल्याने झोन 3 चे पोलीस उपायुक्त गजानन राजमाने यांच्या नेतृत्वात पोलिसांनी मध्यरात्रीनंतर फार्महाऊसवर धाड टाकली.

कपड्यांचेही नव्हते भान

शेकडो तरुण तरुणी दारूच्या नशेत डीजेच्या तलवार नाचताना दिसून आले. अनेकांना त्यांच्या कपड्यांचा भान देखील राहिला नव्हता. काही जण तर अर्धनग्न अवस्थेत या पार्टीत सहभागी झाले होते. अचानक पोलिसांनी टाकलेल्या धाडीमुळे सर्वजणच थबकले. आयोजकांकडे रात्री दहा पर्यंतची पोलिस परवानगी असताना उशिरापर्यंत पार्टी सुरु ठेवण्यात आली होती. तर डीजेसाठी फक्त परवानगी मागण्यासाठी दिलेला अर्ज देण्यात आला होता. मात्र त्यासाठी परवानगी मिळालेली नव्हती.

मोठी एक्सयूव्ही भरून मद्यसाठा

विशेष म्हणजे एक मोठी एक्सयूव्ही भरून मद्यसाठा पोलिसांच्या हाती लागला आहे. या पार्टीत काहींनी ड्रग्स चा वापर केला होता का याचाही तपास पोलीस करीत असल्याची माहिती नागपूर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. हिंगणा पोलीस स्टेशन हद्दीत सुरु असलेल्या या पार्टीची स्थानिक पोलिसांना कशी काय माहिती नव्हती या कारणास्तव हिंगणा पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. सोबतच आयोजकांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती ही पोलीस आयुक्तांनी दिली.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ

निविदा सूचना क्र. ११ सन २०२२-२३

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) दूरध्वनी क्रमांक ०२५१-२६०२३४८ यांनी खालील कामासाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक ०१/०७/२०२२ ते ०८/०७/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि.१४/०७/२०२२ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

| अ क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजीत किंमत (रू.) | इसारा रक्कम (रू.) | सुरक्षा अनामत रक्कम (४%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | **M & R to Ambernath W.W.** Repairs to 170 HP Motor Set No.2 at Bhendipad Booster | १९३१९२/- | २०००/- | एकूण सुरक्षा अनामत रक्कम रु. ७७२८/- अ) प्रारंभिक सुरक्षा अनामत रक्कम रु.३८६४/- ब) चालू देयकातून वसुल होणारी रक्कम रु.३८६४/- | २ महिने (पावसाळ यासह) | रु.२३६/- | वर्ग-ड (Class-D) (विद्युत / यांत्रिक) वर्गाचे कंत्राटदार किंवा PWD/MIDC/ CIDCO किंवा MJP सारखे एखादे सरकारी कार्यालयाचे कंत्राटदार | दि. १४/०७/२०२२ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) | दि. १५/०७/२०२२ रोजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) |

क्र. जिमाका/ठाणे/जाही/२०२२-२३/३४

सही/-
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य.विभाग,अंबरनाथ

टिप - १) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते. विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.
२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र
३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार ०५ ते ११ जुलै - २०२२



## संपादकीय...

## सत्तास्पर्धेतील बदलती गणिते

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी विरोधकांचे बळ अधिक दिसत असतानाच महाराष्ट्रातील सत्तांतर घडले आणि समीकरणे बदलली. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे मौन, 'आप'चे खुले न झालेले पत्ते हे सगळे चित्र पाहता विरोधकांना गतवेळेपेक्षा यावेळी निवडणूक जड जाईल, असे चित्र आहे. सुमारे १५ दिवसांपूर्वीचे चित्र आठवा! देशातील संयुक्त विरोधी पक्षाला राष्ट्रपती पदासाठी दमदार उमेदवार मिळत नव्हता. प्रयत्नांती बाजी मारून नेऊ शकतात, असे दिग्गज नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिला. त्यानंतर गोपाळ कृष्ण गांधी आणि फारुक अब्दुल्ला यांनीही नकारघंटा वाजवली. खरं तर सगळयांनाच भाजपचा विजयरथ वेगाने दौडतांना दिसत आहे. सरतेशेवटी मूळचे भाजपचेच असलेले आणि अलीकडे ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसमध्ये गेलेले देशाचे माजी अर्थमंत्री व परराष्ट्र व्यवहार मंत्री यशवंत सिन्हा यांना मैदानात उतरविण्यात आले.

विरोधी पक्षांकडील ५१.१ टक्के मते आणि अंतर्गत कलहात भाजपमधील मित्रांची मिळणारी मते यामुळे आपला विजय सुनिश्चित आहे, असे सिन्हा यांना वाटत असले तरी यावेळी विरोधकांना ही निवडणूक २०१७ पेक्षाही कठीण जाणार आहे. भाजपने द्रौपदी मुर्मू या आदिवासी महिलेला उमेदवारी दिल्याने विरोधकांचे सगळे अंकगणित बदलले आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात नाट्यमय घडामोडींनंतर एकनाथ शिंदे सरकार स्थापन झाल्याने मुर्मू यांच्या विजयात महाराष्ट्राचे खूप मोठे योगदान राहील, असे चित्र निर्माण झाले आहे. मोदींचा सर्वत्र प्रभाव पाहता मुर्मू यांनी ७५ टक्क्यांपर्यंत मते घेतल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

सतराव्या राष्ट्रपती पदासाठी येत्या १८ जुलै रोजी मतदान होईल. २१ जुलैला निकाल लागेल. यासाठी लोकसभा, राज्यसभा आणि विधानसभेचे सदस्य मतदान करतील. राज्यसभा आणि लोकसभेतील खासदार ७७६ आहेत; तर विधानसभा सदस्यांची संख्या चार हजार १२० आहे. या सगळयांचे एकूण मतमूल्य दहा लाख ९८ हजार ९०३ आहे. उमेदवाराला विजयासाठी पाच लाख ४९ हजार ४५२ मतमूल्य हवे. भाजपकडे ४८.९ टक्के मते आहेत. विरोधी पक्षांकडील ५१.१ टक्के मते आणि अंतर्गत कलहात भाजपमधील मित्रांची मिळणारी

मते यामुळे आपला विजय सुनिश्चित आहे, असे सिन्हा यांना वाटत असले तरी यावेळी विरोधकांना ही निवडणूक २०१७ पेक्षाही कठीण जाणार आहे. भाजपने द्रौपदी मुर्मू या आदिवासी महिलेला उमेदवारी दिल्याने विरोधकांचे सगळे अंकगणित बदलले आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात नाट्यमय घडामोडींनंतर एकनाथ शिंदे सरकार स्थापन झाल्याने मुर्मू यांच्या विजयात महाराष्ट्राचे खूप मोठे योगदान राहील, असे चित्र निर्माण झाले आहे. मोदींचा सर्वत्र प्रभाव पाहता मुर्मू यांनी ७५ टक्क्यांपर्यंत मते घेतल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

सतराव्या राष्ट्रपती पदासाठी येत्या १८ जुलै रोजी मतदान होईल. २१ जुलैला निकाल लागेल. यासाठी लोकसभा, राज्यसभा आणि विधानसभेचे सदस्य मतदान करतील. राज्यसभा आणि लोकसभेतील खासदार ७७६ आहेत; तर विधानसभा सदस्यांची संख्या चार हजार १२० आहे. या सगळयांचे एकूण मतमूल्य दहा लाख ९८ हजार ९०३ आहे. उमेदवाराला विजयासाठी पाच लाख ४९ हजार ४५२ मतमूल्य हवे. भाजपकडे ४८.९ टक्के मते आहेत.

यशवंत सिन्हा विजयाची अपेक्षा बाळगून आहेत व देश पिंजून काढत आहेत. ही लढाई एका विचारप्रणाली विरोधात आणि राज्यघटना वाचविण्यासाठी असल्याचे ते प्रत्येक राज्यात जाऊन सांगत आहेत. हुकूमशाही, एकाधिकारवादी वृत्तीला छेद देण्याचा ८४ वर्षीय सिन्हा यांचा संकल्प आहे. राष्ट्रपती पदासाठी आदिवासी महिला उमेदवाराची निवड केली, अशी दवंडी पिटण्यापेक्षा मोदी सरकारने आठ वर्षांमध्ये आदिवासींसाठी काय केले याचा लेखाजोखा मांडावा, अशी विरोधकांची मागणी आहे. मुर्मू ओडिशामध्ये मंत्री होत्या. झारखंडच्या राज्यपाल होत्या. परंतु त्यांच्या गावात अद्याप वीज पोहोचलेली नाही. अशा स्थितीत त्या निवडून आल्यास देशासाठी काय करतील? असा सवाल विरोधक करत आहेत.

तरीही द्रौपदी मुर्मू यांच्या रूपात महिला आदिवासी उमेदवार देऊन मोदी यांनी विरोधकांचे गणित बिघडवले, हे मान्य करावे लागेल. आदिवासी समाज आपल्यापासून दूर जाऊ नये म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) विरोधातल्या अनेक पक्षांनी सावध पवित्रा घेतला आहे. संसदेत ३७ पक्षांचे लोकप्रतिनिधी आहेत. त्यातील १६ पक्ष एनडीएमध्ये आहेत.

# पहिल्याच पावसात दावे ठरले फसवे!

दर वर्षी मुंबईत होणाऱ्या मुसळधार पावसात मुंबईची तुंबई होत असते, सत्ताधाऱ्यांनी आणि पालिका प्रशासकांनी कितीही दावे केले तरी दर वर्षीच्या पावसात हे दावे फोल ठरतात.

या वर्षीच्या पावसातही मुंबईची अशीच काही स्थिती झाली आहे. जून महिना पूर्ण कोरडा गेल्यानंतर जून महिन्याच्या शेवटच्या दिवसात पावसाने हजेरी लावली आणि पहिल्याच मुसळधार पावसात मात्र मुंबईची दाणादाण झाली. जागोजागी मुंबईतल्या सखल भागात पाऊस झाल्यामुळे पाणी साचले. दादर, माटुंगा, हिंदमाता, काळाचौकी, चेंबूर, सायन, गांधी मार्केट, अंधेरी, विरा देसाई रोड, मिलन सब-वे, अंधेरी सब-वे अशा कित्येक भागात पावसामुळे पाणी साचले होते. रस्त्यावर ट्रॅफिक, वाहतुकीचा खोळंबा, अनेक ठिकाणी वाहतूक वळवली, लोकल उशिरा अशा कित्येक समस्यांना मुंबईकरांना तोंड द्यावं लागलं. हा पाऊस पाहिलाच मुसळधार पाऊस होता आणि असे असतानाही इतक्या समस्या मुंबईकारांसमोर आल्या होत्या. अजून तर पावसाचे ३ महिने बाकी आहेत आणि पहिल्याच पावसात ही अवस्था असेल, तर बाकीच्या दिवसात मुंबईकरांना किती त्रास काढावा लागेल, हे तर म्हणायलाच नको.

या वर्षी ७ मार्चला महापालिकेचा कार्यकाळ संपल्यानंतर ८ मार्च रोजी मुंबई महापालिकेवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आणि यामुळे शेवटच्या स्थायी समितीतील काही प्रस्ताव उशिराने मंजूर करण्यात आले होते. यामुळे पावसाळी कामांना उशिर लागला होता. १६२ कोटींची नालेसफाईची कामे यावेळी देण्यात आली. यात लहान आणि मोठे असे दोन्ही नाले होते. मात्र उशिरा काम दिल्यामुळे काहीसा वेळ लागला. मात्र त्यानंतर




नालेसफाईची कामे प्रत्यक्षात सुरू झाली. मात्र विरोधकांनी देखील प्रशासनाला धारेवर धरले होते. त्यानंतर नालेसफाई पूर्ण झाल्यानंतर आयुक्तांनी १०० टक्क्यांहून अधिक नालेसफाई केली असल्याचा दावा केला होता. मात्र हा दावा या पहिल्या पावसातच फोल ठरला आहे. विशेष म्हणजे मिलन सब-वेमध्ये पाणी साचणार नाही, असाही दावा पालिकेने केला होता. मात्र मिलन सब-वेत पाणी तुंबल्यामुळे वाहतुकीसाठी बंद करावा लागला. यामुळे पालिकेचे सगळे दावे खोटे ठरले, असल्याचं पाहायला मिळाले आहे. हिंदमाता येथे साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी प्रमोद महाजन उद्यानात साठवण टाकी बांधण्यात आली आहे. याच धर्तीवर सुमारे ३० कोटींहून अधिक खर्च करून मिलन सब-वे येथे देखील जलाशय साठवणचे काम सुरू आहे. मात्र याचा तात्पुरता वापर जुलैमध्येही करण्यात येणार होता. मिलन सब-वे येथील साठवण जलाशय हे सुमारे २ कोटी लीटर क्षमतेचे आहे. मिलन सब-वे परिसरात जोरदार पावसामुळे पाणी साचल्यास त्याचा उपसा करून या जलाशयात साठवले जाईल. त्यासाठी ३ हजार घन मीटर प्रतितास क्षमतेचे एकूण दोन उदंचन पंप कार्यान्वित केले जातील. म्हणजेच प्रतितास ६ हजार घनमीटर या क्षमतेने पाण्याचा उपसा होऊ शकणार आहे. ८ एप्रिल २०२२ पासून या साठवण जलाशयाचे काम सुरू करण्यात आले असून ७० मीटर x ५५ मीटर आकाराच्या या जलाशयाची खोली सुमारे १०.५ मीटर असणार आहे, तर पैकी ८ मीटर खोलीपर्यंत खोदकाम पूर्ण झाले आहे, तर आतापर्यंत सुमारे ७० टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे. मात्र तरीही मिलन सब-वेमध्ये पाणी साचले होते आणि वाहतुकीसाठी देखील बंद करण्यात आला होता. इतकेच नाही तर माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी तर मुंबईत पाणी तुंबण्याच्या समस्येला महापालिका प्रशासनच जबाबदार असल्याचं म्हटले आहे. मुंबईत महापालिकेने जिथे जिथे पाणी साचणार असे फ्लडिंग स्पॉट शोधून काढले होते. मात्र यावेळी या फ्लडिंग स्पॉटच्या ऐवजी इतरही नवीन भागांमध्ये पाणी साचले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यामुळे या सगळयाला पालिकाच जबाबदार असल्याचं बोलले आहेत. विशेष म्हणजे नालेसफाई केल्यानंतरही ही परिस्थिती का उद्भवली? याचा विचार पालिकेने करणे गरजेचे आहे. गेले कित्येक वर्षे याच याच समस्यांना पावसाळयात मुंबईकरांच्या समोर येत आहेत. मात्र तारीही या समस्यांचे निवारण कधी झालेले नाही. २६ जुलैसारखा पूर मुंबईत येऊन गेला. मात्र तरीही महापालिका यातून काही शिकलीच नसावी, असे वाटत आहे. आज मुंबईचा विकास झाल्यानंतरही हीच परिस्थिती दर वर्षी येत आहे. म्हणजे हे दुर्दैवच म्हणावे लागेल. आता केवळ पावसाच्या समस्या येतात. मात्र काही दिवसातच मुंबईत खड्ड्यांच्या देखील समस्या उद्भवायला सुरवात होतील. त्यानंतर मात्र मुंबईकरांनी आपला वाली म्हणून कोणाकडे पाहायचा कारण ३० वर्षे ज्यांनी सत्ता उपभोगली. ते आता पावसात फिरतानाही दिसले नाहीत. म्हणजे या वर्षीही मुंबईकरांची परिस्थिती 'जैसे थे' अशीच असणार आहे, हे नक्की. आणि प्रशासन केवळ दावे करणार तेही साचलेल्या पाण्यात वाहून जाणार!

## कल्याण पूर्वेत तिसगाव नाक्यावरील खड्ड्यांनी प्रवासी हैराण, 15 दिवसापूर्वी बुजविले होते खड्डे



कल्याण पूर्वेत तिसगाव नाका येथे भुयारी जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी पाणी पुरवठा विभागाकडून काँक्रीटीकरणाचा रस्ता खोदण्यात आला होता. या रस्त्याखाली जलवाहिनी टाकून झाल्यानंतर खड्डे पडलेल्या रस्त्यावर वाहिनीसाठी खोदलेला रस्ता डांबरीकरणाने बुजवून टाकण्यात आला. सर्वाधिक वर्दळीच्या या रस्त्यावरील खड्डे काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे खराब होऊन या रस्त्यावरील डांबरीकरण निघून रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमुळे या भागात वाहने चालकांकडून संथगतीने चालविली जातात. त्यामुळे या भागात नेहमी वाहन कोंडी होते. सकाळ, संध्याकाळच्या वेळेत या रस्त्यांवर शाळेच्या बस धावतात. या भागातील खड्डे, वाहन कोंडीमुळे विद्यार्थ्यांना शाळेत पोहचण्यास विलंब होतो. खड्डे पडल्यानंतर करण्यात आलेले डांबरीकरण अतिशय निकृष्ट दर्जाचे असते हे या खड्ड्यांमुळे दिसते अशा या भागातील नागरिकांच्या तक्रारी आहेत. खड्डे बुजविण्याच्या कामावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने ठेकेदार मनमानी करून खड्डे भरणी करतो. हे काम कुचकामी असल्याने दोन दिवसात खड्ड्यांवरील डांबर आणि खडी रस्त्यावर येते अशा प्रवाशांच्या तक्रारी आहेत. १३ जून रोजी तिसगाव नाका भागातील खड्डे पालिकेच्या ठेकेदारांनी भरले होते. ते १५ दिवसांनी साध्या पावसाने खराब झाले आहेत. त्यामुळे पालिकेच्या खड्डे भरणीच्या कामाचा दर्जा अतिशय निकृष्ट असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. शहरात काँक्रीटीकरणाचे रस्ते बांधताना रस्त्याच्या एका बाजुला सेवा वाहिन्या टाकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था (डक्ट) करा, अशी मागणी अनेक वर्ष ज्येष्ठ वास्तुविशारद, रस्ते बांधणी तज्ज्ञ पालिकेकडे करत आहेत. त्याची दखल प्रशासनाकडून घेतली जात नाही. ही स्वतंत्र व्यवस्था झाली तर वारंवार काँक्रीटीकरण, डांबरीकरणाचे रस्ते फोडण्याची वेळ प्रशासनावर येणार नाही, अशा जाणकारांच्या सूचना आहेत. पावसाळ्यापूर्वी मे महिना अखेरपर्यंत कल्याण, डोंबिवली, टिटवाळा, २७ गाव भागातील रस्त्यांवरील खड्डे डांबरीकरणाने भरणे आवश्यक होते. १० प्रभागातील अभियंत्यांनी खड्डे भरणे कामाचे प्रस्ताव एप्रिल मध्येच शहर अभियंता विभागाकडे पाठविले होते. परंतु, शहर अभियंत्यांच्या सुट्ट्या, त्यानंतर या विभागातील संथगती कामामुळे या कामाच्या निविदा प्रक्रियाच मेमध्ये शहर अभियंता विभागाकडून सुरू करण्यात आल्या. आता कमी दराच्या ठेकेदाराच्या निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत, असे बांधकाम विभागाचे अभियंते सांगतात. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे प्रभागांमध्ये काम करणाऱ्या अभियंत्यांना नागरिकांच्या सध्या सामोरे जावे लागते.

## बलात्काराच्या खोट्या गुन्ह्यात अडकविलेल्या सावत्र वडिलांची सात वर्षांनी सुटका; फिनेल पिऊन मुलीने केला होता वडिलांवर बलात्काराचा आरोप

कल्याण- सावत्र मुलीचे प्रियकरा बरोबरचे प्रेमसंबंध. त्यातून होत असलेले वाद. या वादातून मुलीने फिनेल प्यायले. रुग्णालयात उपचार घेत असताना मुलीने पोलिसांना जबाब देताना सावत्र वडिल लैगिंक अत्याचार करतात असा आरोप केला. या आरोपांतून सावत्र वडिलांना पोलिसांनी अटक केली. अखेर सात वर्षानंतर मुलीने सावत्र वडिलांवर केलेले आरोप न्यायालयात टिकले नाहीत.

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. डी. हरणे यांनी बलात्काराचा आरोप असलेले डोंबिवली निवासी विपुल नारकर (२८) यांची बलात्काराच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या रामनगर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या तपासावर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रतिवादी विपुल नारकर यांची बाजू न्यायालयात अधिवक्ता गणेश घोलप यांनी मांडली. ॲड. स्वप्निल चौधरी, ॲड. मोनिका गायकवाड यांनी ॲड. घोलप यांना साहाय्य केले. ॲड. गणेश घोलप यांनी सांगितले, मुंबईत छापखान्याचा व्यवसाय करणाऱ्या विपुल यांची काळीचौकी (मुंबई) येथे खानावळ चालविणाऱ्या एका ३४ वर्षाच्या घटस्फोटीत




महिलेशी तिच्या भावाच्या मध्यस्थीने ओळख झाली. या महिलेला १५ वर्षाची मुलगी, १८ वर्षाचा मुलगा आहे. ओळखीचे रुपांतर दोघांच्या प्रेमात झाले. विपुलने घटस्फोटीत महिलेसह तिच्या मुलांचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. या कुटुंबाला विपुलने डोंबिवलीतील आयरे गाव भागात पागडी पध्दतीने चार लाख रुपये खर्चून घर घेऊन दिले. मुलांना डोंबिवलीतील शाळेत प्रवेश करुन दिला.

घरगुती वादातून मुलीने सावत्र वडील विपुल नारकर यांना अडचणीत आणण्याचा निर्णय घेतला. 'सावधान इंडिया' दूरचित्रवाणीवरील मालिका बघून मुलीला ही कल्पना सुचली. मी प्रियकरा सोबत फिरते. मोबाईलमधील अश्लिल चित्रफित दाखवत जीवे ठार मारण्याची धमकी देत सावत्र वडील बलात्कार करत होते, अशी तक्रार रामनगर पोलीस ठाण्यात मे २०१५ मध्ये केली. ही तक्रार करताना मुलीने फिनेल प्यायले होते. वडिल आपल्यावर अत्याचार करतात. त्यामुळे हे टोकाचे पाऊल उचलले अशी तक्रार पीडित मुलगी करत होती. तक्रार दाखल होताच रामनगर पोलिसांनी मुलीचे सावत्र वडील विपुल नारकर यांना अटक केली. या गुन्ह्याचा तपास महिला पोलीस अधिकाऱ्याने करण्याऐवजी याच पोलीस ठाण्यातील नितीन मुदगून या उपनिरीक्षकावर सोपविण्यात आला. पुरुष डॉक्टरांनी या मुलीची वैद्यकीय तपासणी केली, असे ॲड. घोलप यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. सरकार पक्षातर्फे पीडिता, तिचा भाऊ, प्रियकर, शाळा मख्याध्यापक असे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. पीडितने आपल्या बाजुने साक्ष देण्यासाठी आपला दुसरा प्रियकर, घटस्फोट घेतलेले वडील यांनाही बोलविले होते. उलट तपासणीमध्ये मुलीने बलात्कार झाल्याने नव्हे तर फिनेल प्यायलयाने उपचारासाठी रुग्णालयात दाखल होते. विपुल यांनी घेतलेले घर विकले होते. बलात्कार झाल्याचा अहवाल तपास कागदपत्रांमध्ये नव्हता, असे ॲड. घोलप यांनी सांगितले.

न्यायालयाने दोन्ही बाजू तपासल्या. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यापासून ते तपासापर्यंत विरोधाभास न्यायालयाला दिसून आला. हे सर्व रचलेले प्रकरण असल्याचे निदर्शनास आल्यावर न्यायालयाने सात वर्ष तुरुंगात असलेल्या विपुल नारकर यांची निर्दोष मुक्तता केली, असे ॲड. घोलप यांनी सांगितले.

# राज ठाकरेंच्या सभेत मनसे जिल्हाध्यक्षाची चैन चोरणाऱ्यांना अखेर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

औरंगाबादच्या मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर 1 मी रोजी झालेल्या जाहीर सभेत नांदेडचे मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदा यांची सोन्याची साखळी चोरणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत. बीड जिल्ह्यातील आरोपीला पोलिसांनी पुण्यातून अटक केली आहे.

सोबतच त्याच्या साथीदाराला सुद्धा अटक करण्यात आली आहे. त्याच्या ताब्यातून साखळी सुद्धा जप्त करण्यात आली आहे. दत्ता श्रीमंत जाधव (वय 25 वर्ष, रा. गांधीनगर झोपडपट्टी ता.जि.बीड), उमेश सत्यभान टल्ले (वय 35 वर्ष रा.बीड) असे या दोन्ही चोरट्यांची नावे आहेत. औरंगाबाद इथे 1 मे रोजी आयोजित केलेल्या राज ठाकरेंच्या जाहीर सभेसाठी



मराठवाड्यासह नांदेड जिल्ह्यातूनही मोठ्या प्रमाणात मनसैनिक दाखल झाले होते. राज ठाकरेंच्या या सभेत विक्रमी गर्दी झाली होती. ज्यात मनसेचे जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदार हे देखील हजर होते. नांदेड जिल्ह्यातील गोल्डमॅन म्हणून मॉन्टीसिंह जहागीरदार यांची ओळख आहे. मॉन्टीसिंग जहागीरदार हे आपल्या अंगावर जवळपास 50 तोळे सोने नेहमी परिधान करतात. पण राज ठाकरे यांच्या सभेच्या दिवशी चोरट्यांनी त्यांच्या अंगावरील सोन्यावर डोळा ठेवून आपला उद्देश साधला. त्यांची दहा लाख किंमतीची आणि 200 ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी लंपास केली होती. त्यांनतर याप्रकरणी सिटी चौक पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पुण्यातून केली अटक...

मॉन्टीसिंग जहागीरदार यांनी गुन्हा दाखल करताच पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवली. यादरम्यान पोलिसांनी सभास्थळी लावलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले.

यावेळी साखळी चोरणारे बीड जिल्ह्यातील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी दत्ता जाधव याचा बीड जिल्ह्यात जाऊन शोध घेतला. मात्र तो बीडमध्ये मिळून आला नाही. याचवेळी जाधव हा पुण्यात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांनी पुण्यातून जाधव याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने उमेश सत्यभान टल्ले याच्या मदतीने साखळी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरी गेलेली साखळी जप्त केली आहे.

# सी आई डी ऑफिसर बनून लोकांना ठगणाऱ्या तोतयास नवघर पोलिसांनी केली अटक.

भाईंदर : सी.आय.डी ऑफीसर असल्याची बतावणी करुन फसवणुक करणा-या आरोपीलामुद्देमालासह अटक - नवघर गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी. अधिक माहितीनुसार श्री. मोहन सुरु शेट्टी, वय ५६ वर्षे हे दिनांक २२/०६/२०२२ रोजी त्यांच्या मूळ गावी जाण्यासाठी भाईंदर रेल्वे स्टेशन येथे रेल्वेचे रिझर्वेशन करुन परत घरी जात असताना एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, अंगाने मजबुत याने शेट्टी यांना तो सी.आय.डी ऑफीसर आहे अशी बतावणी करुन त्यांच्या गळयातील चैन, हातातील अंगठी तसेच रोख रक्कम ८,९००/रुपये असा एकुण १,१८,९००/- किंमतीचा मुद्देमाल फसवणुक करुन घेवुन गेला होता. सदरबाबत मोहन सुरु शेट्टी यांनी नवघर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केल्या वरून अनोळखी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे तांत्रीक विश्लेषन करुन आरोपी मुन्नावर ऊर्फ अन्वर



अब्दुल हमीद शेख, वय ४५ वर्षे, रा. सोनाजी घोसावलाच्या मागे, इब्राहीम आईची चाळ, कसाईवाडा, कुरेशीनगर, कुर्ला (प.) मुंबई यास नालासोपारा येथुन ताब्यात घेवुन दि.२७/०६/२०२२ रोजी अटक केली. तसेच आरोपीकडुन शेट्टी यांची फसवणुक केलेल्या मुद्देमालापैकी १,१०,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत . अटक आरोपी हा फसवणुकीच्या गुन्हयांमध्ये सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द मुंबई, ठाणे, नवी मुंबई आयुक्तालयात तसेच पश्चिम बंगाल इ. ठिकाणी ४८ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-01, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/सुशिलकुमार शिंदे (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/नवनाथ घुगे, सुरज घुनावत, ओमकार यादव, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

# पुण्यातील लवळे फाट्यावर भीषण अपघात; अपघातात 10 महिन्यांच्या चिमुकल्यासह आईचा जागीच मृत्यू

पुणे : पुण्यातील पिरंगुटनजीक असलेल्या लवळे फाटा येथे काल संध्याकाळी साडेपाच वाजल्याच्या सुमारास एक ट्रक व दुचाकी याचा अपघात झाला असून, या अपघातामध्ये तीन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. तर, एक व्यक्ती जखमी झालेली आहे. या भीषण अपघातात 10 महिन्यांच्याचिमुकल्यासह आईचाही दुर्दैवी मृत्यू झाला. आणखी एका दुचाकी चालकाला धडक बसल्याने त्याचाही यामध्ये मृत्यू झाला असून, एक जखमीला रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. अपघातातील मृतांची नावे : या अपघातात रेश्मा (वय २५ वर्षे) या महिलेचा व त्यांचा 10 महिन्यांचा मुलगा



रिवांश पवन पटेल या बालकाचा मृत्यू झाला आहे. महिलेचे पती पवन रमेश पटेल ( वय ३२ वर्षे) हे जखमी झाले आहेत, तर नांदे गावचे रहिवासी तानाजी विठ्ठल ढमाले (वय वर्ष अंदाजे ३० ते ३५ ) यांचादेखील या अपघातादरम्यान मृत्यू झाला आहे. ब्रेक फेल झाल्याने ट्रकने दिली धडक : लवळे फाट्यावर फरशीने भरलेला ट्रक पौडच्या दिशेने सायंकाळच्या सुमारास जात होता. त्याच्या पुढे दोन दुचाकी आणि एक चारचाकी अशी तीन वाहने प्रवाशांसह जात होती. यावेळी ट्रकचे ब्रेक फेल झाले. ट्रकचा वेग जास्त असल्याने यावेळी चालकाला काहीही करता आले नाही. हा वेगवान आणि ब्रेक फेल झालेला ट्रक समोरील वाहनांना जोरदार धडकला. त्यावेळी पुढील बाजूस असलेल्या दुचाकीवर बाळासह चाललेल्या दाम्पत्याला जोरदार ठोकरल्याने बाळ आणि आईचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघात घडलेल्या ठिकाणी तत्काळ दखल घेत पोलिसांनी पुढील कारवाई सुरू केली. अपघातामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली होती.

# महिला वेश्यादलालास अटक करून 3 पिडीत मुलींची सुटका - भाईंदर पोलीस पथकाची कारवाई

मिरारोड : अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाने वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या महिला वेश्यादलावर अटक कारवाई करून तिच्या ताब्यात असणाऱ्या ०३ पिडीत मुलींची सुटका केली आहे. अधिक माहिती नुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना दिनांक दि.३०.०६.२०२२ रोजी गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, साक्षी ही महिला मिरा-भाईंदर परिसरातील तिच्या संपर्कात असणाऱ्या पुरुष गि-हाईकांना मुलींचे फोटो पाठवून गि-हाईकांच्या पंसतीनुसार वेश्यागमनाच्या मोबदल्यात मिरा-



भाईंदर परिसरातील लॉजवर मुली पुरविते.मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गि-हाईक व पंच यांना मॅकडोनाल्ड हॉटेल समोरील रोडवर, कनकिया रोड, मिरारोड पूर्व येथे पाठवुन सत्यता पडताळली व पोलीस पथकासह ०५.४० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल लता उर्फ साक्षी शिंगारे हिने ०३ मुलींना दाखवुन बोगस पुरुष गि-हाईकाकडुन वेश्यागमनाची एकुण रु. ६,६४०/- रक्कम स्विकारली होती त्यानुसार तिला तिथेच पोलिसांनी सापळा रचून रंगेहात रोख रक्कम मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०३ पिडीत मुलीची सुटका केली. सदर घटनेबाबत सपोनि/उमेश पाटील यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने महिला आरोपीविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त, (मुख्यालय), अतिरिक्त कार्यभार (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली .श्री देविदास हंडोरे/पो.निरिक्षक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर, सपोनि/तेजश्री शिंदे भरोसा सेल, सपोउपनि/उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, मपोहवा/सुप्रिया तिवले व चा.पोहवा/सम्राट गावडे यांनी केली आहे.

# पत्नीला माहेरी जाण्यास नकार देणाऱ्या वडिलांवर मुलाकडून चाकू हल्ला

शहरातील अल्तमश कॉलनीत एक धक्कादायक घटना समोर आली असून, शुल्लक कारणावरुन मुलाकडून जन्मदात्या बापावर चाकू हल्ला करण्यात आला आहे. पत्नीला माहेरी जाण्यासाठी वडिलांनी नकार दिल्याने आधी वाद झाला,

त्यांनतर मुलाने घरातील गुप्तीने वडिलांवर हल्ला केला.

ज्यात वडील गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहे. तर मुलाला पोलिसांनी अटक केली आहे. आमीर इरफान शेख (22, रा. रहीमनगर, अल्तमश कॉलनी) असे आरोपी मुलाचे नाव आहे.

**नेमकं काय घडलं...**

काही महिन्यांपूर्वीच आमीरचा विवाह झाला आहे. दरम्यान रविवारी घरी असताना त्याच्या पत्नीचा भाऊ, त्याची बायको घरी आले होते.

यावेळी त्याचे वडील सुद्धा घरातच होते. दरम्यान अमीरच्या पत्नीने भावासोबत




माहेरी जाण्याची इच्छा व्यक्त केली. अमीरकडून सुद्धा होकार मिळाला. पण याचवेळी अमीरच्या वडिलांनी सुनेला माहेरी जाण्यासा नकार दिला. त्यामुळे बाप-लेकात सुरवातीला वाद झाला. त्यांनतर वाद एवढ्या विकोपाला गेला की, अमीरने घरातील गुप्ती सदृश हत्याराने वडिलांच्या डोक्यात वार केले. त्यानंतर पोटात मागील बाजूने हल्ला केला.

ज्यात इरफान गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

**पोलिसांनी ठोकल्या बेड्या...**

पतीने सासऱ्यावर चाकू हल्ला करताच आमिरच्या पत्नीने आरडाओरडा केला. तिचा आवाज ऐकून शेजाऱ्यांनी धाव घेत इरफान यांना रुग्णालयात दाखल केले. वडीलांना रुग्णालयात दाखल करून अमीर पुन्हा घरी आला. त्यांनतर घरातील रक्त पुसून घेतले. हल्ला करताना वापरलेली गुप्ती सुद्धा पाण्याने धुवून घेतली. त्यांनतर धुतलेली गुप्ती घरातील कपाटीखाली लपवून फरार झाला. जिन्सी पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत अमीर फरार झाला होता. त्यामुळे पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवली आणि त्याला नारेगाव भागातून अटक केली.

**तलाठ्याचा मृतदेह सापडला...**

चार महिन्यांपूर्वी सेवा बजावून निवृत्त झालेल्या एका तलाठ्याने शहरातील सिध्दार्थ उद्यानात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. बशीर अहमद शेख (58) असे मृतदेह सापडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. शहरात राहणाऱ्या बहिणीला भेटून परत गावाकडे जाण्यासाठी निघाले असताना त्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. आधी अंगावर कटरने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. नंतर गळफास घेतल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र हत्या की आत्महत्या दोन्ही दृष्टीने पोलीस तपास करत आहेत.

# ना कॉल आला, ना ओटीपी

## तरीही आरोग्य अधिकाऱ्याच्या खात्यातून पन्नास हजार उडवले

अज्ञात फोन कॉल उचलू नका किंवा आपल्याला आलेला ओटीपी कुणालाही शेअर करू नका असे आवाहन पोलिसांकडून नेहमीच केले जाते. मात्र सायबर भामटे आता याच्याही पुढे गेल्याचे पाहायला मिळत आहे. कारण बीड जिल्ह्यातील गेवराई एका तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना ना कुणाचा कॉल आला, ना त्यांनी कुणाला ओटीपी शेअर केला, तरीही त्यांच्या खात्यातून भामट्याने दहा टप्प्यांत 50 हजार रुपये काढून घेतले. या घटनेनंतर आता पोलीसही चक्रावून गेले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ. संजय रामराव कदम (रा. नवजीवन कॉलनी, बसस्थानकामागे, बीड) हे गेवराई येथे तालुका आरोग्य अधिकारी आहेत. दरम्यान दुपारी बारा वाजता ते शहरातील जिल्हा प्रशिक्षण संस्थेत




होते, यावेळी त्यांना मोबाईलवर एका संदेश आल्याने त्यांनी तो उघडून पाहिला. ज्यात एसबीआयच्या खात्यातून 5 हजार रुपये कपात झाल्याचा संदेश होता. त्यांनतर अवघ्या काही मिनिटांत टप्प्याटप्प्याने 10 वेळेस त्यांच्या खात्यातून प्रत्येकी पाच हजार रुपये असे एकूण 50 हजार रुपये डेबिट झाले. यानंतर त्यांनी शिवाजीनगर ठाणे गाठून फिर्याद देत, गुन्हा दाखल केला.

**बँकेने केले हातवर...**

आपल्या खात्यातून अचानकपणे 50 हजार रुपये गायब झाल्याने डॉ. संजय कदम चक्रावून गेले. त्यामुळे त्यांनी तत्काळ एसबीआयच्या मुख्य शाखेत धाव घेत विचारपूस केली. मात्र, त्यांना बँकेकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाली. तसेच स्वतः बँकेकडून कोणतेही कपात झाली नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे हतबल झालेल्या कदम यांनी अखेर पोलिसात धाव घेऊन गुन्हा दाखल केला.

**शिक्षकालाही लावला चुना...**

बीड जिल्ह्यात दुसऱ्या आणखी एका घटनेत जि.प. शाळेत शिक्षक असलेल्या लहू लक्ष्मण चव्हाण (रा. छत्रपती संभाजीनगर, पांगरी रोड, बीड) यांना क्रेडिट कार्ड बंद करण्याचा बहाणा करून सायबर भामट्याने 19 हजार 561 रुपयांना चुना लावला आहे. आधी व्हिडीओ कॉल करून फोन पे सुरू करायला लावून माहिती जाणून घेतली आणि त्यांनतर बँकेतील पैसे उडवले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर चव्हाण यांनी शिवाजीनगर ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून संतोष कुमार नावाच्या भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डोंबिवलीत तब्बल 47 लाख रुपये किमतीचा गांजा जप्त, दोघांना ठोकल्या बेड्या

मुंबई : मुंबई परिसरात गांजा विक्री करण्यास आलेल्या दोन गांजा तस्करांना मानपाडा पोलिसांनी डोंबिवली ग्रामीण भागातील उंबारली येथून सापळा रचून बेड्या ठोकल्या आहेत. हे दोघे जण गांजाची विक्री करण्यासाठी ओडिसाहून डोंबिवलीला आले होते. फैसल ठाकूर आणि आतिफ अन्सारी अशी दोन्ही आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी या दोघांकडून 47 लाख 76 हजार रुपये किमतीचा 272 किलो गांजा, एक गाडी, आठ मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. कल्याण डोंबिवलीत पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात गांजा जप्त करण्यात आला आहे. यामागे आणखी किती जण आहेत? हा गांजा कुठून आणला? कुणाला विक्री केली जाणार होती? याचा तपास मानपाडा पोलीस करत आहेत. डोंबिवली मानपाडा पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांना काही व्यक्ती डोंबिवली ग्रामीण भागात विक्रीसाठी गांजा



घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधिकारी अनिल भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली एका पथकाने डोंबिवली ग्रामीण मधील उंबार्ली परिसरात सापळा रचला. यावेळी पोलिसांना एक संशयित गाडी दिसली. पोलिसांनी ही गाडी थांबवून आतील व्यक्तींकडे विचारपूस केली. त्यावेळी त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांचा या दोघांवर संशय बळावला. पोलिसांना संशय आल्यामुळे गाडीतील दोघांना ताब्यात घेत गाडीची तपासणी केली. यावेळी गाडीत 272 किलो वजनाचा गांजा आणि आठ मोबाईल मिळाले. पोलिसांनी तत्काळ हा सर्व मुद्देमाल जप्त केला आणि दोघांना ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत 47 लाख 76 हजार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस तपासा दरम्यान या दोघांनी हा गांजा ओडिसा येथून आणल्याचे सांगितले. हा गांजा छोट्या छोट्या विक्रेत्यांना वितरीत करण्यात येणार होता, अशी माहिती या दोन तस्करांनी पोलिसांना दिली. या प्रकरणात आणखी काही साथीदार असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, हा गांजा मुंबईत कोणाला विक्री करणार होते याचा तपास पोलीस करत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात कल्याण डोंबिवलीत पहिल्यांदाच गांजा पकडण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस यंत्रना सतर्क झाली आहे. कल्याण पोलीस ठाण्याचे डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी सुनील कुराडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898